**वाचले :-** १) पोलिस अधिक्षक सातारा यांचेकडील पत्र क्र.जिविशा७/प्र.आदेश/४०१२/२०१६ दि. १०/०५/२०१६

२) मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश ) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३७ (१) (३) मधील तरतूदी.

---

क्रमांक/डिसी/एमएजी/२/कावि/५५९/१६
एस. आर. -१६/२०१६

जिल्हादंडाधिकारी कार्यालय, सातारा
सातारा, दिनांक - १३ /०५/२०१६

## आदेश

ज्या अर्थी, पोलीस अधिक्षक सातारा यांनी माझे असे निदर्शनास आणून दिले आहे की,**१) सण/उत्सव/यात्रा :-** सातारा जिल्हयामध्ये सालाबादप्रमाणे दि.१४/०५/२०१६ रोजी छ.संभाजीराजे जयंती, दि.२१/०५/२०१६ रोजी बुध्द पोर्णिमा व राजर्षी शाहु महाराज जयंती साजरी होणार आहे. तसेच दि.२२/०५/२०१६ ते दि.२५/०४/२०१६ रोजी जोतीबा यात्रा घाडगेवाडी ता.फलटण, दि.२५/०५/२०१६ ते दि.२६/०५/२०१६ रोजी नृसिह यात्रा येणपे ता.कराड व दि.२३/०५/२०१६ रोजी शब-ए-बरात असे सण/उत्सव यात्रा साज-या होणार आहेत. तसेच सातारा जिल्हयामध्ये विविध पोलीस ठाणेचे हद्दीत लहान मोठया यात्रा संपन्न होत आहेत. यास्तव कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**२) म.न.से.आंदोलन :-** सातारा नगरपालिका हद्दीतील गुरुवारपेठ व मल्हारपेठ येथे असणारे भवानी विद्या मंदिर येथील नगरपालिकेचे आरक्षण क्र.१२८ येथे उभी असणारी इमारत लालबहादुर शास्त्री कॉलेज या संपुर्ण इमारतीचे बांधकाम हे अनाधिकृत असुन त्यावर कार्यवाही करावी अन्यथा आंदोलन करणेत येईल असा इशारा म. न.से.तर्फे देण्यात आलेला आहे.यास्तव कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**३) बेमुदत धरणे आंदोलन :-** गौतम यादव प्रतिष्ठान व महिंद प्रकल्पग्रस्त समिती यांचे नेतृत्वात महिंद व सळवे येथील धरणग्रस्त धरणात गेलेल्या जमीनी व जमीन निर्वाळ भत्ता मिळावा या व इतर मागण्याचे अनुषंगाने दि.०९/०५/२०१६ रोजी पासुन तहसिलदार कार्यालय पाटण समोर बेमुदत धरणे आंदोलनास बसणार असल्याचा इशारा दिलेला आहे. यास्तव कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**४) अतिक्रमणे :-** सातारा जिल्हयामध्ये विविध पोलीस ठाणेचे हदीत प्रशासनाचे अतिक्रमने काढण्याच्या मोहिमा सुरु असुन त्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**५) सराफ असोसिएशन यांचे मागणीबाबत :-** केंद्र सरकारने सोन्याच्या दागिन्यावर लागु केलेली एकसाईज डयुटी पुर्ण पणे रदद करावी. व अन्य मागण्याच्या अनुषंगाने सराफ असोसिएशन यांनी दुकाने बंद ठेवलेली होती. अद्याप त्यांचे मागणीचे अनुषंगाने केंद्र सरकारकडुन काही कार्यवाही झाली नसलेने, याअनुषंगाने सातारा जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**६) सातारा शहरातील पाणी रस्त्याचा प्रश्न :-** सातारा शहरातील रस्ते पावसामुळे खराब झालेले असून ठिकठिकाणी रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत. तसेच काही ठिकाणी पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या जोडण्याचे, तसेच शहरात रस्त्याची कामे चालू आहेत. तसेच शहरात जलवाहिन्या टाकणे, रस्ते डांबरीकरन करणे चालू असल्याने काही ठिकाणी रस्त्यांची खुदाई केलेली आहे. तसेच सातारा जिल्हयातील ग्रामिण भागातही रस्ते मोठयाप्रमाणावर खराब झाल्याने रस्त्याची कामे तात्काळ करावीत या मागणीसाठी ग्रामस्थांकडून धरणे आंदोलन, रास्ता रोको ,मोर्चा यासारखे आंदोलनात्मक कार्यक्रम करण्यात येत आहेत. सदरचा पाणी/रस्त्यातील खड्यांचा प्रश्न व इतर प्रश्न न सोडवल्यास त्याअनुशंगाने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**७) दुष्काळी भागात वीज भारनियमन अनुशंगाने आंदोलन :-** सातारा जिल्हयाच्या काही भागात दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण झालेली आहे. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, तसेच चारा छावण्या सुरु कराव्यात, दुधास योग्य भाव मिळावा, शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफी करावी याचबरोबर शहरी तसेच ग्रामिण

भागात विद्युत वितरण कंपनी कडून वीज भार नियमन चालू आहे. त्यामुळे पिण्याचे व शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. वीज भारनियमन होवू नये, पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे अशी ग्रामीण भागासह शहरातील लोकांची मागणी आहे. अशा परिस्थितीत वीज भार नियमन केलेस त्यावरुन आंदोलनात्मक कार्यक्रम होणेची शक्यता नाकारता येत नाही.

**८) आंदोलने/इशारे** :- प्रशासनाकडुन वाळु उपसा/वाळु साठे याबाबतची कारवाई करणेत येत असलेने काही पक्ष/ संघटना/वाळु व्यवसायीक त्याबाबत नाराजी व्यक्त करीत आहेत.जिल्हयातील नदी पात्रातुन वाळू चोरीवेळी झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करुन गुन्हे दाखल होत नाहीत तोपर्यंत वाळूचे लिलाव करु नयेत अशी मागणी विविध पक्ष/संघटना करीत आहेत. तसेच उपोषण,आंदोलने,रास्तारोको सारखे आंदोलनाबाबत निवेदने देत आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**९) विविध प्रकारच्या आंदोलनात्मक कार्यक्रमा बाबत** :- सध्या जिल्हयात विविध राजकीय पक्ष/ सामाजिक संघटना या आरक्षण तसेच इतर विविध मागण्यांचे अनुषगाने मोर्चा, रास्ता रोको, आंदोलन, धरणे आंदोलन उपोषण यासारख्या आंदोलनात्मक मार्गाचा अवलंब करत आहेत या अनुषंगाने कोणत्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न भविष्यात निर्माण होवु शकतो.

**१०) शेतकरी व इतर संघटना यांचे आंदोलनाबाबत** :- बळीराज,स्वाभिमानी व इतर शेतकरी संघटना या दुष्काळी परीस्थीतीमुळे शेतकऱ्याचे कर्ज माफी करावी, विद्युत बिले माफ करावी, शेतीमालाला दर मिळावा तसेच ऊसाची थकीत बिले शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावीत, निर्यात बंदी उठवावी इत्यादी मागणीसाठी शेतकरी व इतर संघटना आक्रमक होवुन विविध प्रकारची आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरील सर्व बाबी लक्षात घेता सातारा जिल्हात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी दि.१३/०५/२०१६ चे ००.०० ते दि.२७/०५/२०१६ चे २४.०० वा.पर्यंत संपूर्ण सातारा जिल्ह्यात मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये जमावबंदी व सदरच्या कायद्याचे कलम ३७ (१) अन्वये शस्त्रबंदी आदेश लागु होणेस विनंती आहे. तसेच सदरच्या आदेशाचे कलम ३७ (१),(३) मधुन या कालावधीत शांततापुर्ण साजरे होणारे सण, उत्सव,यात्रा या प्रकारचे कार्यक्रम वगळण्यास विनंती केली आहे.

त्याअर्थी, मी **अमृत नाटेकर, प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी**, सातारा मला असलेल्या अधिकारान्वये मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियन २०१४ चे कलम ३७ (१) (३) **अन्वये संपूर्ण सातारा जिल्हात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश संपूर्ण सातारा जिल्हयात सण, यात्रा व उत्सवाचे कार्यक्रम वगळून दिनांक १३/०५/२०१६ चे ००.०० वाजलेपासून ते दिनांक २६/०५/२०१६ चे २४.०० वाजेपर्यंत शस्त्र बंदी व जमावबंदी आदेश जारी करीत आहे.**

**वरील कालावधीत खालील कृत्ये करणेस मनाई करीत आहे.**

अ) शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, बंदुका, सुऱ्या, काठ्या किंवा शारीरीक इजा करणेसाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तु बरोबर नेणे.

ब) कोणताही दाहक पदार्थ किंवा यांजकडे पदार्थ बरोबर नेणे.

क) दगड किंवा अस्त्र, सोडावयाची अस्त्र, फेकरावयाची हत्यार किंवा साधणे बरोबर घेणे, जमा किंवा तयार करणे.

ड) व्यक्तीची अगर प्रेते किंवा त्यांचे प्रतिमाचे प्रदर्शन करणे.

ई) सार्वजनिक रितीने घोषणा करणे, गाणी म्हणणे किंवा वादय वाजवणे, सभ्यता अगर निती या विरुध्द असतील अशी किंवा राज्याची शांतता धोक्यात येईल असे प्राधिकाऱ्यास वाटेल अशी भाषणे करणे हावभाव करणे सोंग आणणे अशी चित्र चिन्ह फलक-अगर इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तु तयार करणे किंवा त्यांचा लोकात प्रसार करणे. अशा मनाईचे उल्लंघन करुन जर कोणताही इसम अशी कोणतीही वस्तु बरोबर घेवून जाईल किंवा कोणताही जिन्नस दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ अस्त्र जवळ बाळगतील तर तो कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून निशस्त्र केले जाणेस किंवा दाहक पदार्थ अस्त्र त्याच्या पासुन जप्त केले तरी पात्र

असेल आणि अशा तऱ्हेने धरलेली वस्तु स्फोटक पदार्थ किंवा अस्त्र हे सरकार जमा होईल. पोटकलम (३) अन्वये असलेल्या अधिकारान्वये सार्वजनिक सुव्यवस्था राखणेसाठी कोणत्याही जागावास किंवा मिरवणूकीस वरील कालावधीत व कार्यक्षेत्रात या आदेशान्वये मनाई करीत आहे.

मुंबई पोलीस अधिनियम १९५१ (सुधारणा अध्यादेश) महाराष्ट्र पोलीस अधिनियम २०१४ चे कलम ३७ (१) (३) मधील या हुकुमाच्या तरतुदी खालील नमुद केलेल्या इसमाना लागू होणार नाही.

१. शासनाची सेवा करणारे किंवा नोकरी करणेच्या कामी ज्यांच्या वरीष्ठांनी निर्दीष्ट केलेवरुन अगर त्यांना कर्तव्याच्या स्वरुपामुळे अशी खंड १ मध्ये उल्लेखलेल्या पैकी वस्तु धारण करणे किंवा देणे आवश्यक आहे.

२. ज्यांना ज्यांना शारिरीक दुर्बलतेच्या कारणावरुन जिल्हादंडाधिकारी अगर त्यांना प्राधिकृत केलेले अधिकाऱ्याना लाठी किंवा काठी वापरणेस परवानगी दिली असेल अशी व्यक्ती.

३. सदरचा आदेश यात्रा, धार्मिक कार्य, लग्न विधी कार्य तसेच अंत्यविधी कार्यास लागू होणार नाही.

४. ज्या लोकांना शांततेचे मार्गाने एकत्र जमून कोणताही कार्यक्रम साजरा करावयाचा असेल त्यावेळी मागिल अधिक्षक, संबधीत उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच संबंधित पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरिक्षक यांची आगावू परवानगी घेतली असेल तर त्यांना सदरचा आदेश लागू होणार नाही.

**सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी दिनांक १३ /०५/२०१६ रोजी काढण्यात आला आहे.**

ADDITIONAL DISTRICT MAGISTRATE SATARA

सही/-
अमृत नाटेकर
**प्रभारी अपर जिल्हादंडाधिकारी सातारा**

प्रत :- पोलिस अधिक्षक सातारा यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषीत.

प्रत :- उपविभागीय दंडाधिकारी उपविभाग यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन यांचेकडे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी सातारा यांचे कडे स्थानिक वृत्त पत्रामध्ये प्रसिध्दी साठी.

प्रत :- मॅनेजर येरवडा प्रिंटीग प्रेस पुणे यांचे कडे राजपत्रात प्रसिध्दी साठी.

---

अपर जिल्हादंडाधिकारी सातारा करिता